# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४
२०२ ५३५
२८३ ५२४
फॅक्स : २०२ ९३४
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ

क्र.मजीप्रा/सस/तांशा–१/३५०/ 133
दिनांक : १३ जानेवारी,२०००

## तांत्रिक परिपत्रक क्र.३४

**विषय** : कंत्राटदारांनी योजनेसाठी आणलेल्या व न वापरलेल्या पाईप्सच्या सुरक्षित संग्रहाबाबत.

लोकप्रतिनिधींनी माझ्या असे निदर्शनास आणले आहे की, बऱ्याच कामांवर कंत्राटदार, कामांसाठी विकत घेतलेले परंतू अद्याप जमिनीखाली न टाकलेले पी.व्ही.सी.पाईप उघड्यावरच रचून ठेवतात व ते पाईप्स् असेच उघड्यावर, उन्हात, पावसात पडून राहून खराब होतात व पुढे त्यांचाच योजनांमध्ये वापर झाल्यावर ते फुटतात/त्रास देतात. ॲसबेस्टॉस सिमेंटचे पाईप्स्हि असुरक्षित व अव्यवस्थित ठेवल्यामुळे त्यांना सूक्ष्म तडे जातात व ते पुढे त्रास देतात.

ह्याबाबत या आधी अनेक वेळा मी परिपत्रकांव्दारे/पत्राव्दारे/वैयक्तिक रित्या सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. परंतू त्याचे पालन होत आहे की नाही हे क्षेत्रीय अधिकारी बघत नाहीत असे दिसते यास्तव पुढील सूचना पुन्हा एकदा देण्यात येत आहेत.

१) **सर्वच प्रकारचे पाईप्स** व्यवस्थित स्टॅक करुन ठेवावेत. पाईप हाताळण्याबाबत दि. १३/७/९९ चे परिपत्रक कृपया नीट वाचून त्यातील सूचनांची अंमलबजावणी करावी.

२) पी.व्ही.सी.पाईप्स् हे नेहमी झाकून ठेवावेत; म्हणजे उन्हापासून होणारे नुकसान टळेल. पाईप्स् दीर्घकाळ साठा करुन ठेवायचे असल्यास ते शेडमध्येच ठेवावेत.

३) रबर रिंग्ज, रबर गास्केटस् व सी.आय.डी.जॉईंटस् सुध्दा नीट जतन करुन ठेवायला हवेत. कारण त्यांचे गुणवत्तेवरच पाईप लाईनची कार्यक्षमता अवलंबून असते. रबराच्या वस्तू कधीही उन्हात ठेवू नयेत. त्या नेहमी बंद खोलीत किंवा तयार शेड मध्ये ठेवाव्यात.

वरील सूचनांचे पालन होते की नाही हे प्रत्येक उप अभियंता, कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता ह्यांनी त्यांचे कामावरील दौऱ्याचे दरम्यान बघणे आवश्यक आहे व चुका असतील तर संबंधित कंत्राटदाराला त्यांचे निराकरण करण्याची सक्ती करावी. ह्या सूचनांचे पालन करण्याकडे दुर्लक्ष करीत असलेल्यांची नावे मध्यवर्ती कार्यालयास कळवावी.

१३/१/२०००
(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव(तांत्रिक)

प्रत माहितीसाठी सादर,
मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता ,मंत्रालय,मुंबई
मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,मंत्रालय,मुंबई
मा.राज्यमंत्री,नगर विकास, मंत्रालय,मुंबई
सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी